**सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड**
रेल्वे स्टेशन रोड, नांदेड - ४३१६०१
dyceogadzpnanded@gmail.com दुरध्वनी : ०२४६२ - २३४६६८.

1583
जा.क्रं.जिपनां/साप्रवि/आस्था-२ब/ / २०२३
दिनांक : 17/ ०३ /२०२३

प्रति,

१) खाते प्रमुख (सर्व), जिल्हा परिषद नांदेड
२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व), जि.नांदेड

**विषय :- सर्वसाधारण बदल्या सन २०२३**
**सहाय्यक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, वरिष्ठ सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक** या संवर्गातील अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या प्राथमिक वास्तव्य जेष्ठता यादया प्रसिध्द करणे बाबत..

संदर्भ : १. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र. जिपब/प्र.क्र.-११२/आस्था-१४ दि. १५/०५/२०१४.
२. शासन शुध्दीप्रत्रक क्र.जिपब/४८१६/ प्र.क्र.-१६/आस्था-१४ दि. ०२/०१/२०१७.
३. शासन पुरकपत्र क्र.जिपब/४८१७/ प्र.क्र.-२२८/आस्था-१४ दि. ०४/०३/२०१९
४. या कार्यालयाचे पत्र जा.क्रं.जिपनां/साप्रवि/आस्था-२ब/१०४३/२०२३ दि.२७/३/२०२३

उपरोक्त विषयान्वये ग्रामविकास विभागाकडील संदर्भाधीन शासन निर्णय, शुध्दीपत्रक व पुरकपत्रान्वये जिल्हा परिषदेच्या गट - क (वर्ग-३) व गट- ड (वर्ग-४) कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्यांबाबत सुधारित धोरणानुसार निश्चित करण्यात येवून बदल्यांची कार्यवाही पूर्ण करण्याबाबत निर्देश आहेत.

उपरोक्त संदर्भ क्र.०४ च्या पत्राच्या अनुषंगाने खाते प्रमुख (सर्व), जिल्हा परिषद नांदेड व गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व), जि.नांदेड यांच्याकडून या विभागाच्या अधिनस्त असलेल्या गट - क (वर्ग-३) अधिकारी / कर्मचाऱ्यांची माहिती या कार्यालयास प्राप्त झाली आहे. सदर प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे संदर्भीय शासन निर्णय, शासन शुध्दीपत्रक व शासन पुरकपत्रातील सुधारीत तरतुदीनुसार सर्वसाधारण बदल्या सन २०२३ साठी सहाय्यक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, वरिष्ठ सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक या संवर्गातील बदलीपात्र अधिकारी / कर्मचारी यांची दिनांक ३१/०५/२०२३ रोजीची सेवा गृहित धरुन तयार करण्यात आलेल्या प्राथमिक वास्तव्य ज्येष्ठता याद्या यासोबत प्रसिध्द करण्यात येत आहेत. सदरील प्राथमिक वास्तव्य ज्येष्ठता याद्या संबधित अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

सदर यादीमध्ये संबधितांच्या नावासमोर घेण्यात आलेल्या नोंदी बाबत काही हरकती/सुचना/ आक्षेप/ व तक्रारी असल्यास त्या यादी प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून २७/०४/२०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत संबधिताच्या कागदपत्राच्या पुरावासह सादर करावेत. विहित मुदतीनंतर आलेल्या आक्षेप / हरकतींचा विचार केला जाणार नाही. याबाबत कोणतही तक्रार उभ्दवल्यास त्यास सर्वस्वी आपले कार्यालय जबाबदार राहील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

तसेच सर्व सहाय्यक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, वरिष्ठ सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक यांची नावे जेष्ठता सुचीत आलेली आहेत किंवा कसे याची खात्री करावी. ज्या अधिकारी / कर्मचारी यांना प्रशासकीय बदलीतून सुट किंवा प्राधान्य घ्यावयाचे आहे, त्यांनी त्यांचे विहित नमुन्यातील विनंती अर्ज (सुट / प्राधान्य) देण्यासंदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्रासह दि. २७/०४/२०२३ पुर्वी कार्यालय प्रमुखांचे शिफारशीने या कार्यालयास सादर करण्याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

**सोबत : प्राथमिक वास्तव्य जेष्ठता यादी (०४)**

**( डॉ.सुधीर ठोंबरे)**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)**
**जिल्हा परिषद नांदेड**